NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २६.१०.२०२६ सोमवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २५.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये २३ ईसमावर कारवाई करून एकुण १,५४,८९,०६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०१ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १९९ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ८५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ६९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ३१ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १११ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०३ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १८ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०७ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ११०७ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे २० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २६ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९४० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,३४,९००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :– पोलीस ठाणे बेलतरोडी येथील एमडी तस्करांना अटक. तसेच कुख्यात एमडी तस्कर व नगरसेवक मोटघरे यांचेवर फायरींग प्रकरणातील मकोका व एनडीपीएस गुन्हयातील पाहिजे आरोपी विशाल उर्फ फल्ली यास रामेश्वरम येथुन अटक.

दिनांक २४.१०.२०२६ चे १६.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांना एमडी पावडरबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत नरेंद्र नगर, रिंग रोडवरील भारत पेट्रोल पंपचे बाजुला असलेल्या विजया अपार्टमेंटचे तिसऱ्या माळयावरील लाड यांचे मालकीचे फ्लॅटमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे इसम नामे १) अनिकेत उर्फ अन्नु संजय बिहारे वय १९ वर्ष रा. प्लॉट क्र. २९, पवनशक्ती नगर, नवाज आटा चक्कीजवळ, वाठोडा, नागपूर २) तुफानसिंग बालुसिंग सिसोदीया वय ३८ वर्ष रा. ग्राम बाटखेडी, पंचायत तालावली, पोस्ट चोमेला जि. झालवा, राजस्थान ३) कृष्णा उर्फ पहेलवार सुनिल वर्मा वय १९ वर्ष रा. लोधीपुरा, बजेरीया झेंडा चौकजवळ, गणेशपेठ, नागपूर ४) राहुल उर्फ

भाया राजकुमार गोंड वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. १०८, दुर्गा मंदीरजवळ, वाठोडा, नागपूर ५) शुभम उर्फ डोरेमॉन दिलीप नरवरीया वय ३१ वर्ष रा. स्वामीनगर, दिवाण ले आऊट, मानेवाडा, नागपुर हे मिळुन आले. पंचासमक्ष त्यांची व फ्लॅटची झडती घेतली असता, पाचही आरोपींचे ताब्यातुन एकुण १,४०५ ग्राम एमडी पावडर मिळुन आली. त्यांचे ताब्यातुन एमडी पावडर, ०६ मोबाईल फोन, फ्लॅटमधील दिवाणवर ठेवलेली रोख ३,४४,७००/— रु. तसेच वर्ना कार, ०४ दुचाकी वाहने, वजनकाटा व इतर साहित्य असा एकुण १,५४,५०,७००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, आरोपी क्र. १ याने व विशाल उर्फ फल्ली पुथ्वीलाल गुप्ता रा. श्रावणनगर, वाठोडा असे दोघांनी मिळुन त्यांचे परिचयातील आरोपी क्र. २ व त्याचा मित्र भुपेंद्र सिसोदीया रा. झालावाड, राजस्थान यांचेकडुन एमडी पावडर मागविली होती. आरोपी क्र. २ याने नागपुर येथे एमडी पावडर आणुन दिल्याचे सांगितले. आरोपी हे एमडी पावडर नागपुर शहरातील इतर किरकोळ एमडी पावडर विक्री करणारे आरोपी क्र. ३, ४ व ५, ६ तसेच इतर पाहिजे आरोपी यांना आरोपी विशाल उर्फ फल्ली याचे सांगण्यावरुन त्यांचे मागणीप्रमाणे विक्री करीत असल्याचे सांगितले. रोख रक्कम ही किरकोळ एमडी पावडर विक्री करणारे यांचेकडुन ॲडव्हान्स स्वरुपात घेतल्याचे सांगितले. वरील पाचही आरोपी तसेच आरोपी क्र. ६) कुणाल दशरथ समुद्रे वय २९ वर्ष रा. काशिबाई देऊळ, तुळशीबाग, कोतवाली, महाल, नागपूर तसेच पाहिजे आरोपी यांचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. ०६ आरोपींना अटक करण्यात आली.

गुन्हेशाखा युनिट क्रं. ५ पोलीसांनी गुन्हयातील पाहिजे आरोपी विशाल उर्फ फल्ली पुथ्वीलाल गुप्ता रा. श्रावणनगर वाठोडा, नागपूर हा व त्याची मैत्रिण सहेली पंधराम उर्फ सोनु यांच्याविषयी माहिती प्राप्त झाल्याने, तांत्रिक तपास करुन आरोपी हा तामिळनाडु येथील रामेश्वरम येथे असल्याची खात्री झाल्याने, त्याचेवर पाळत ठेऊन त्या दोघांनाही रामेश्वरम येथुन ताब्यात घेतले आहे. आरोपींना तेथील मा. न्यायालयासमक्ष हजर करुन ट्रान्झीट रिमांड प्राप्त केला असुन त्यांना नागपुर येथे घेऊन येत आहेत.

आरोपी विशाल उर्फ फल्ली पुथ्वीलाल गुप्ता हा कुख्यात एमडी तस्कर असुन पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत नगरसेवक शुभम मोटघरे यांचेवर झालेल्या गोळीबार प्रकरणातील खुनाचे प्रयत्नाचे गुन्हयातील मुख्य पाहिजे आरोपी असुन नमुद गुन्हयामध्ये मकोका अंतर्गत कलमवाढ करण्यात आलेली आहे. आरोपी विशाल उर्फ फल्ली याचेविरुध्द विविध पोलीस ठाणेंमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, मकोका, एनडीपीस ॲक्ट अन्वये गुन्हे दाखल असुन तो अनेक महिन्यांपासुन स्वत:चे अस्तित्व लपवुन पळत होता.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. श्री विनायक गोल्हे, सपोनि गणेश कदम, पोउपनि. विशाल सांगोळे, पोहवा प्रविण भगत, राजेंद्र टाकळीकर, शेख नजीर, राजु टाकळकर, रुपेश नानवटकर, अनिस खान, मुकेश राऊत, राजुसिंग राठोड, प्रमोद बावणे, गणेश ठाकरे, चंद्रशेखर गौतम, निलेश गायकवाड, पोअं. रोशन तांदुळकर, लिलाधन खिरडकर, दिपक बावणकर, मोहन सानप, अमोल भक्ते, आशिष पवार, योगेश महाजन, सुधीर तिवारी, मपोहवा लिना थुल, तसेच पोनि भरत क्षिरसागर, पोहवा विवेक आढाऊ, गणेश जोगेकर, एनडीपीएस पथक व सायबर सेलचे पोउपनि विवेक झिंगरे व त्यांचे पथकाने केली.

नागपुर शहर पोलीसांनी संयुक्तरित्या केलेल्या ०१ जानेवारी २०२६ ते आजपावेतो नागपूर शहरात एनडीपीएस कायदा अन्वये दाखल गुन्हयांची व जप्त मुद्येमालाची माहिती खालील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	अंमली पदार्थ	दाखल केस	वजन			किंमत	इतर साहीत्य किंमत	एकुण मुद्येमाल किंमत	अटक आरोपी
			किलो	ग्रॅम	मि.ग्रॅम				
१	गांजा	८४	९८९	१८७	२८०३ ८३	२,४७,८०,९४५	——	५,९०,०५,८३५	१४०
२	हायड्रोपोनि	०१	००	१३	००	४५,५००	१,४२,२५०	१,८७,७५०	०२
३	चरस	०१	००	३९	००	३,००,०००	२५०	३,००,२५०	०१
४	एमडी (मेफेड्रोन)	८८	११	९७६	१०२३ ९	६,६६,७५,६६७	——	८,७९,६२,७६७	१४०
५	डोडा	०३	१०	३१९	००	१,५४,७४०	——	१०,२८,८००	०१
६	एलएसडी	०१	००	००	१७०	१,७०,०००	२,६७,०००	४,६७,०००	०२
७	टॅबलेट	०१	००	००	००	२,८६२	३,०००	५,८६२	०१
८	सेवनार्थी	५५८	—	—	—	—	—	—	६०२
एकुण		७३७	१०११	५३४	१३२१२	९,२१,२९,७१४	५,६०,७५,२३८	१४,८२,०४,९५	८९२

३) गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :— दरोडयाचे गुन्हयातील ०६ आरोपींना अटक.

दिनांक २३.१०.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत घर क्र. ४३, नेताजी को—ऑपरेटीव्ह सोसायटी, पुर्वा रेसीडेन्सी, फ्रेन्डस् कॉलनी, गिट्टीखदान येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती सौम्या सुब्रमण्यम पालुरु वय ३८ वर्ष हया व त्यांचा १४ वर्षाचा मुलगा हे आपले घरी झोपले असतांना. त्यांचे घराचे वरिल मजल्याचे पायऱ्यावरून चार ते पाच अनोळखी इसम यांनी फिर्यादीच्या घरात प्रवेश करुन फिर्यादी व त्यांचे १४ वर्षाचे मुलास बंदुक व चाकु दाखवून, फिर्यादीस विचारले की, "पैसे कहा है।" तेव्हा फिर्यादीने सांगीतले की, पैसे नाही आहे. तुम्ही घरात बघा, यावरून आरोपी यांनी फिर्यादीच्या घरातील आलमारीची पाहणी केली. या दरम्यान फिर्यादी व मुलगा हे आरडाओरड करू लागल्याने आरोपीतांपैकी एकाने फिर्यादीचे मुलाची हाताने मान पकडली व फिर्यादीच्या घरातील दोन फोन किमंती अंदाजे ६०,०००/— रू उचलले व "अगर तुम चिल्लाऐगे तो तुम्हे जान से मार देगे" अशी धमकी दिली व मुलाचे गळ्यातील सोन्याची चैन हिसकवण्याचा प्रयत्न केला व आवाजामुळे गॅलेरीच्या रस्त्याने पळुन गेले. या प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या रिपोर्टवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपींविरुध्द कलम ३१०(२),३३३,३११,३५१(३) भा.न्या. संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

घटना अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्याने वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ घटनास्थळी भेटी दिल्या व मार्गदर्शन केले. गिट्टीखदान पोलीसांनी घटनास्थळाचे आजूबाजूचे सर्व परिसरातील सी.सी.टि.व्हि. फुटेज ची पडताळणी केली. तसेच गोपनीय बातमीदारांकडून प्राप्त माहीतीच्या आधारे गुन्ह्यातील सहभागी आरोपींना निष्पन्न करुन आरोपी क्र. १) सुमेद उर्फ छोटा राजकुमार सोमकुवर वय ३२ वर्ष रा. मानवता नगर, संबोधी बुध्द विहार, पो.ठाणे गिट्टीखदान, नागपूर २) आकाश संजय मेश्राम वय ३१ वर्श रा. मानवता नगर, संबोध्दी बुध्द विहार मागे, माहुरे पेट्रोल पंप जवळ, गिट्टीखदान, नागपूर ३) भुषण संजय अलोने वय १८ वर्श रा. आठवा मैल, त्रिरत्न बौध्द विहार जवळ, पो.ठाणे वाडी, नागपूर, ४) निखील प्रफुल दुबे वय २० वर्श रा. प्लॉट नं. १८, खान लेआऊट, डोबीनगर, वडधामना, पो.ठाणे वाडी, नागपूर ५) पियुश धनराज गोस्वामी वय १९ वर्ष रा. घर नं. ८५४, कृष्णानंद सोसायटी, नवनीत नगर, अमरावती रोड, पो.ठाणे वाडी, नागपूर ०६) शेख तौहीद उर्फ येडाभाई शेख फारुख वय २० वर्ष रा. धम्मदीप नगर, इटाभट्टी चौक, यशोधरानगर, नागपूर व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात

घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, आरोपी क्र. १ हा फिर्यादीचे पतीचे कार्यालयात ०४ वर्षापासुन ऑफीसबॉय म्हणुन काम करीत होता व फिर्यादीचे पती हे ऑफीसची रक्कम घरी आणुन ठेवतात व घटनेचे सहा ते सात दिवसांपुर्वी त्यांनी घरी मोठी रक्कम आणुन ठेवल्याचे माहिती प्राप्त झाल्याने त्याने त्याचे इतर साथीदार आरोपी यांचेसोबत संगनमत करुन, कट रचुन, दरोडयाची योजना केल्याचे सांगितले. आरोपी क्र. १ ते ६ यांना अटक करण्यात आली आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतलेले आहे. गुन्हयातील पाहिजे आरोपी यांचा शोध सुरु आहे. आरोपींचे ताब्यातुन गुन्हयात हिसकावलेले ०२ फोन तसेच गुन्हयात वापरलेली काळया रंगाची खेळण्यातील बंदुक, स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ४० सीडब्ल्यु ८३०१, टिव्हीएस ज्युपिटर क्र. एमएच ३१ जीएच ०६८२, पल्सर १२५ क्र. एमएच ३१ जीसी ७२८१ असा एकुण कि. २,६०,२००/– रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनिता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. शिवाजीराव गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. श्री सारंग मिराशी, सपोनि बालाजी लालपालवाले, पोउपनि. खुशाल राठोड, सफौ. अनिल त्रिपाठी, पोहवा चंद्रशेखर यादव, महेश बावणे, विश्वास बलादे, महेश जाधव, सतिश ठाकुर, विशाल नांदेकर, पोअं. सुनिल कुंवर, राहुल पांडे, राजेंद्र वानखेडे, आकाश लोथे, अविनाश पांडे, घनश्याम बोरकर, नितेश वाकडे, अमित तांडे, सतिश येसनकर, विक्रम ठाकुर यांनी केली.

४) वाठोडा पोलीसांची कामगिरी :– बनावट चलनी नोटा तयार करणाऱ्या आरोपीस अटक.

रमेश गंगाधर हरडे वय ५५ वर्षे, रा. फ्लॅट क्र. ४०२, राधाकृष्ण पॅलेस, नरहरी नगर, मानेवाडा–बेसा रोड, नागपूर यांनी पोलीस ठाणे वाठोडा येथे येऊन माहिती दिली की, त्यांचे पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतील प्लॉट क्र. १८, श्री स्टार को–ऑपरेटिव्ह सोसायटी, वाठोडा, नागपूर येथील त्यांच्या मालकीचे घराचे पहिल्या मजल्यावर हॉल+किचन+बेडरुम अश्या तिन खोल्या त्यांनी पुष्पम कृष्णा बंडाने, वय २९ वर्षे, यास दि. २६/०९/२५ पासून भाड्याने दिलेल्या आहेत. भाडेकरुने दोन महिन्याचे भाडे न दिल्याने ते भाडे मागण्या करीता त्याचेशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु त्याचेशी कोणताही संपर्क न झाल्याने, ते दि. २४/१०/२०२६ रोजी वेळ ११. ३० वा. सुमारास पुष्पम कृष्णा बंडाने यास भाडे मागण्याकरीता घरी गेले व घराचे मुख्य प्रवेशव्दार जोरजोराने ठोठावून आंत मध्ये कोणी आहे काय? याची खात्री केली असता कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने भाडेकरुने आतमध्ये त्याचे जिवास काही बरेवाईट तर केले नाही या शंकेमुळे त्यांनी त्यांचे जवळ असलेल्या दुस–या मास्टर चावीने खोलीचे दार उघडले असता हॉलमधील सोफ्यावर ५००/–रु. मूल्याच्या चलनी नोटांसारखे दिसणारे नोटा अस्ताव्यस्त पडलेल्या दिसल्याने, त्यांनी पो. ठाणेस माहिती दिली. वाठोडा पोलीसांचे पथक घटनास्थळी गेले असता, खोलीत सोफासेट वर ५००/–रु. मुल्याच्या नोटा अस्ताव्यस्त पडलेल्या आढळल्या. त्यापैकी काही कागदांच्या एका बाजुला चलनी नोटांसारखा मजकूर व चिन्ह छापलेली आढळले. त्यापैकी काही कागदांच्या एका बाजुस चलनी नोटांसारखा मजकूर व चिन्हे छापलेली दुसरी बाजु कोरी असल्याचे, तर काही कागदांच्या दोन्ही बाजुंवर ५००/–रु. मुल्याच्या नोटांसारखा मजकुर व चिन्हे छापलेली आढळले. तसेच त्याच्या बाजुस प्लॅस्टीक मध्ये गुढाळलेले बंडल आढळले. नमुद प्रकार हा प्रथमदर्शनी बनावट भारतीय चलन नोटा तयार करणे व त्या चलनात आणन्याचा प्रकार असल्याचे दिसुन आले.

प्लॅस्टीकचे बंडल उघडून त्याची पडताळणी केली असता, ५००/–रु. मूल्याच्या भारतीय चलनी नोटांसारखे दिसणारे बनावट चलनी नोटांसारखे दिसून येत असल्याने, त्यांचे स्वरूप व कायदेशीर स्थिती निश्चित करण्यासाठी घटनास्थळी पंचासमक्ष सदर कागद (नोटांसदृश) ची मोजनी केली असता ५००/–रु. दराच्या मुळ

चलनानुसार किंमत ३७,००,०००/—रु. तसेच नोटांच्या एका बाजुला नोटांसारखा मजकूर व चिन्हे असून दुसरी बाजू कोरी होती अश्या नोटासदृश्य कागद एकत्र करुन त्याचे भारतीय चलनानुसार मोजनी केली असता त्याची किंमत ४८,००,०००/—रु. इतकी असल्याचे दिसुन आली. घटनास्थळाची बारकाईने तपासणी केली असता, ASUS कंपनीचा लॅपटॉप, EPSON कंपनीचा कलर प्रिंन्टर, ०२ पेपर कटर, एका कागदी खोक्यात वेगवेगळ्या रंगाच्या शाईच्या बॉटल, कोरेकागज, ०६ पेपर ज्याचे दोन्ही बाजुस ५००/—रु. दराच्या (नोटांसदृश) प्रिंन्ट केलेले पेपर मिळून आल्याने एकुण किंमती ३७,८३,६००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपी **पुष्पम कृष्णा बंडाने**, वय २९ वर्षे, सध्या रा. प्लॉट क्र. १८, श्री स्टार को—ऑपरेटिव्ह सोसायटी, वाठोडा, नागपूर मुळ रा. घर नं. ७५२, त्रिमुर्ती नगर, बी/एच वर्मा ट्रॅक्टर्स कंपनी नागपूर याचेविरुध्द कलम १७८, १८०, १८१ भा.न्यासं. अन्वय गुन्हा नोंद करण्यात आला.

वाठोडा पोलीसांचे तपास पथकाने तांत्रिक तपास करुन तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, सापळा रचुन, गुन्हयातील आरोपी यास ताब्यात घेऊन अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. श्री प्रमोद पोरे, सपोनि संतोष सपाटे, पोउपनि. विक्रांत कारटकर, सफौ. अनिल धनोले, गणेश बोंद्रे, पोहवा आशिष श्रीखंडे, चंदन यादव, नापोअं. चेतन ऊतखेडे, पोअं. विपीन पिल्लेवान यांनी केली.

(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>

दिनांक २४.१०.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक २५.१०.२०२६ चे ०४.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत प्लॉट क्र. १३९, गंगानगर, कोलबास्वामी सोसायटी, हजारीपहाड नागपूर येथे राहणारे राहुल कमलेश खोटे वय ३५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह बहिणीचे मुलाचे वाढदिवसाचे कार्यक्रमाकरीता छिंदवाडा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे गॅलरीचा दरवाजा तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीमधील सोन्याचे वेगवेगळे दागिने व एक किलो वजनी चांदीचे पैंजन असा एकुण किंमती ३,०९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. सचिन खुटवळ ९०९६९५३२८६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.